'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# प्राण्यांविषयीची पारंपरिक विचारसरणी : एक तात्त्विक विवेचन

**डॉ. संजय ह. पाटील**
**(तत्त्वज्ञान विभागप्रमुख)**
**देगलूर महाविद्यालय, देगलूर.**
**जि.नांदेड - ४३१७१७.**
**E-mail- sanpatdegloor@gmail.com**
**Mobile : 9423439303.**

"पारंपरिक नीतिशास्त्र हे मनुष्यकेंद्रवादावर आधारीत आहे. मनुष्यकेंद्रवाद म्हणजे मानवेतरांना वगळून केवळ माणसांच्या हितसंबंधाचा विचार करण्याची पध्दती. जगाचे मानविसंदर्भातच अर्थान्वीकरात करणे असाही याचा अर्थ मांडला जातो. मनुष्य तत्वता म्हणजे नीतिशास्त्र हा केवळ माणसांचाच प्रांत असून नैतिक विचारास प्राप्त असलेल्या समुदायांमध्ये मानवेतर प्राण्यांचा समावेश करणे शक्य नाही, आणि ते योग्यही नाही. असा दृष्टीकोन आहे".[१]

पाश्चात्य विशेषतः औद्योगिकीकरण झालेल्या देशामध्ये मानवेतर प्राण्यांविषयी दीर्घ काळापासून दुय्यम स्वरुपाचा नैतिक दृष्टीकोन स्वीकारण्यात आलेला आहे. त्याच्या मुळाशी नेहमी मनुष्यकेंद्रित दृष्टीकोन हाच आधार राहिला आहे. आपल्या पृथ्वीवर प्राय, आणि बहूदा एकमेव असे नैतिकदृष्ट्या महत्वाचे जीव आपणच, असेच माणसाने म्हटले आहे. या विचारसरणीची मुळे पुढीलप्रमाणे पाहावयास मिळतात.

**प्राण्यांबाबत धार्मिक दृष्टीकोन :-**

पाश्चात्य संस्कृतीवर ग्रीको-रोमन व ज्यू-ख्रिश्चन परंपरांचा प्रभाव राहिला आहे. किंबहुना ती संस्कृतीच या दोहोंच्या संमीलनातून निर्माण झाली आहे. या संस्कृतीतील प्रधान घटक धर्म हाच राहिला आहे. ख्रिश्चन धर्मामध्ये मानवेतर प्राण्यांना काही अधिकार बहाल केले आहेत का, ते पाहू जाता दुर्देवाने त्याचे उत्तर नकारार्थीच येते. त्याच वेळेस पौर्वात्यांच्या धर्मामध्ये मात्र मानवेतरांना अधिक नैतिक अधिष्ठान दिलेले आढळते. किंबहूना, प्रथमदर्शनी, त्यामधील काही विचारधारा मनुष्यकेंद्रिततेच्या विरोधात आहेत, असेच दिसते. "ख्रिस्ताच्या जन्मापूर्वी सुमारे ३००० वर्ष संस्कृत वेदांमधून 'कोणाही जिवाबाबत दुजाभाव बाळगू नको' असे सांगताना 'अहिंसा' (Non-Voilence) तत्वाचा पुरस्कार केला गेला आहे. हिच विचारधारा बौध्द, हिंदू आणि जैन यांसह बहुतांश पौर्वात्य धर्मांसाठी आधारभूत ठरली आहे".[२] जैनांनी तर अहिंसा या तत्वास एक नवीन सर्वश्रेष्ठ असा आयाम दिला. याच तत्वांचा त्यांनी आपल्या जीवनामध्ये कमालीचा कठोरपणे वापर केला आहे. आजही जैनधर्मीय अहिंसा या तत्वाचे शब्दशः कठोरपणे पालन करतात. अर्थात, पौर्वात्य परंपरेमध्ये प्राणिहत्या होतच नव्हती, असे नाही. काही यज्ञांमध्ये पशुबळी दिला जात असे. पण ही बुध्दाने मोडून काढली, नाही तर संस्थाही पूर्णपणे बंद पाडली. आज तर तिचा मागमूसही दिसत नाही. पाश्चात्य धर्मामध्ये मात्र अशी काही सुधारक चळवळ (Progressive movement) किंवा प्रतिधर्म (Counteriligion) निर्माण झालेला आढळत नाही.

"ज्यू-ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मपरंपरा मानवेतरांबाबत कमी अनुकंपा दर्शविणाऱ्या पंरपरा आहेत".[३] प्राणिहक्कवादी धार्मिक लिखाणात आढळणाऱ्या प्राण्यांबाबत कमी अनुकंपा दर्शविणाऱ्या वचनांचा नेहमीच दाखला देताना दिसतात. आपल्यालाही अशी अनेक वचने पाहावयास मिळतील. त्यातील जुन्या करारातील जेनेसीसच्या कथेतील आधार तर अत्यंत महत्वाचा आहे.

ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

मुस्लीम धर्माचा मानवेतरांबाबतचा दृष्टीकोन फार वेगळा नाही. कुराणातील अनेक परिच्छेद प्राण्यांच्या बळी देण्याच्या परंपपरेसंदर्भात असल्याचे आपल्याला पाहावयास मिळेल. मुस्लीम धर्मातील कुर्बानी ही संकल्पना प्राण्यांचा बळी घेऊनच पूर्ण केली जाते. मुस्लीम धर्मानुसार सणांमध्ये प्राण्यांच्या बलिदानाचेच उदात्तीकरण (Glorification) केलेले असते.

पाश्चात्य धार्मिक परंपरेमध्ये मनुष्यकेंद्रितता हा प्रभावी मुद्दा आहे. "जेनेसीसमधील १:२६"[४] या बहुचर्चित परिच्छेदातून हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. मानवेतर जीव हे केवळ माणसाच्या सुविधेसाठी अस्तित्वात आहेत आणि त्यांना कसेही वागवावे, असा या परिच्छेदाचा एक अर्थ होतोच, तर माणसाला मानवेतर प्राण्यांवर प्रभुत्व (Domination) वर्चस्व असते आणि निरंकुशपणे नव्हे तर जबाबदारीने त्यांनी त्यांचा उपयोग करावा, असा त्याचा दुसरा अर्थ लावला जातो. कोणताही अर्थ घेतला तरीही साऱ्या सृजनामध्ये (Creation) माणसाला विशेष स्थान आहे. अशीच या वचनाच्या लेखकाची धारणा होती, हेच दिसते. माणसाला मानवेतरांपेक्षा विशेष नैतिक स्थान (moral status) आहे, तो देवाशी सध्दर्मी आहे. कारण त्याच्याजवळ बुध्दिक्षमता व विवेकाची क्षमता (Rationality) आहे व अश क्षमता असणारा तो एकमेव जीव आहे, असा हा युक्तिवाद केला जातो. काही जण माणसातील ही विवेकशक्ती म्हणजेच अविनाशी आत्मा (Immortalsoul) आहे, असेही मानतात.

**पारंपरिक तात्विक दृष्टीकोन :-**

१) विवेकशक्ती (Rationality) माणसाला मानवेतरांपेक्षा वेगळी ठरवून श्रेष्ठ दर्जा देते, असे संत थॉमस अक्विनासचे म्हणणे होते. त्यांच्या विचारांचा आढावा घेऊ.

अक्विनासवर प्रभाव असणारा तत्वज्ञ ॲरिस्टॉटल हा नास्तिक होता. धार्मिक ग्रंथ आणि चर्चप्रमुखांनी लावलेला त्या ग्रंथांचा अन्वयार्थ यांची ॲरिस्टॉटलच्या विचारांशी सांगड घालणे, हे ॲक्विनासने आपले जीवनध्येय ठरविले होते. सर्व जिवांमध्ये आत्मा आहे, असे सांगताच ॲरिस्टॉटल त्यांची श्रेणीबध्द रचना करतो, "पोषक (Nutritive) भूक असणारा(Appetitive) संवेदनक्षम (Sensary), स्वयंचलित (Locomotive) आणि बौध्दिक (Intellectual) अशा वरच्या पायरीवरील प्रत्येक आत्म्यामध्ये त्याच्यापेक्षा निम्न स्तरावरील आत्म्याचे सारे गुण असतात".[५] असे ॲरिस्टॉटलने म्हटले आहे. बौध्दिक क्षमताधारी आत्म्याला निःसंशयच सर्वोच्च श्रेणीत स्थान मिळाले आहे. म्हणजेच, विवेकहीन आत्मा असणारे जीव कनिष्ठ आहेत ते वरिष्ठांच्या सेवेसाठी आहेत, म्हणून विवेकी जीवांनी अविवेकी जिवांवर राज्य करावे, त्यांच्या स्वतःच्या उद्देशांसाठी वापर करून घ्यावा, वनस्पती या प्राण्यांसाठी तर प्राणी हे माणसांसाठी निर्माण झालेले आहेत, असा याचा अर्थ निघतो. याच्याही पुढे जाऊन ॲरिस्टॉटल म्हणतो की, अविवेकी माणसे ही त्यांच्या ज्येष्ठांची गुलाम असली पाहिजेत. त्याच्या या मतावरुन असे स्पष्ट होते की, त्या काळी अस्तित्वात असलेल्या गुलामगिरीच्या प्रथेचे समर्थन करण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. सश्रध्द (आस्तिक) परंपरेमध्ये सर्वश्रेष्ठ स्थान ईश्वराचे असते. ॲरिस्टॉटल नास्तिक असल्यामुळे ईश्वराच्या सर्वश्रेष्ठ स्थानी त्याने विवेकाची (Rationary) प्रतिष्ठापना केली आहे. त्याच्या म्हणण्यानूसार, विवेकी जीव सर्वश्रेष्ठ आणि इतर जीव त्याचे पूरक असतात. ॲरिस्टॉटलच्या माणूस व मानवेतर निसर्ग यांच्या हितसंबंधाबाबतच्या या प्रतिपादनावर आधारित मत ॲक्विनास मांडतो. त्याचे हे प्रतिपादन अशासाठी महत्वाचे आहे की, त्याचाच प्रभाव संपूर्ण मध्ययुगीन ख्रिश्चन जगतावर व चर्चवर पडला आहे. त्यामुळे तो ख्रिश्चन परंपरेतील एक महत्वाचा संत ठरला आहे.

परमेश्वराने निसर्गातील जिवांची एक श्रेणीबध्द रचना केली आहे, त्यामुळे निम्न स्तरावरील जिवांना मारुन त्यांचे भक्षण करणे उच्च स्तरावरील जिवांना शक्य व्हावे, असा ॲक्विनासचा युक्तिवाद आहे. वनस्पती या प्राण्यांकडून अन्नासाठी मारल्या जातात आणि प्राण्यांना अन्नासाठी माणसे मारतात, ॲक्विनासच्या मतानूसार, "प्राण्यांना विवेक

ISSN :
2348-7143
Oct-Nov-Dec
2017

नसतो आणि त्यांच्या हालचाली, प्रतिक्रियात्मक कृती या केवळ एखाद्या 'नैसर्गिक प्रेणतूनच' झाल्यासारख असतात. यातूनच असे दिसते की, नैसर्गिकरीत्याच ते गुलाम आहेत आणि इतरांच्या वापरासाठीच तयार झाले आहेत".[६] ॲक्विनास पुढे असेही म्हणतो की, प्राणी हे माणसाची मालमत्ता आहेत, आणि वैयक्तिक मालमत्ता असल्याने दुसऱ्याच्या प्राण्याला इजा पोहोचविणे अयोग्य असेल.

ॲक्विनासच्या या प्रतिपादनावरून टॉम रेगन आणि पिटर सिंगर पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढतात. "माणसाचे प्राण्यांवरील 'वर्चस्व' म्हणजेच विवेकाची अविवेकावरील सत्ता होय. अविवेकी जिवांना ईश्वराच्या दृष्टीने काहीच किंमत नाही, केवळ विवेकी जीवांसाठी त्यांचे अस्तित्व असते".[७] केवळ माणूसच एकमेव नैतिकदृष्ट्या महत्वाचा घटक आहे, तसेच ॲक्विनासचे विचार आहेत. माणूस हा मानवेतर प्राण्यांबाबत एखाद्या क्रूर कृतीतून जर एखाद्या विवेकी जिवावरच अन्याय होत असेल किंवा त्या माणसाच्या संपत्तीचे (म्हणजेच मानवेतर प्राणी) तरच ती कृती अयोग्य ठरते, असाच या बाबीचा अर्थ आहे. मानवेतर हे नैसर्गिक घटक असून त्यांचे स्वतःसाठी म्ळणून स्वतःचे असे अधिकार व मूल्य-महत्व (Inherent Value Worth) आहे, असे प्राणिहक्कवाद्यांचे म्हणणे आहे. अशी भूमिका ॲक्विनासच्या विचारसरणीमध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अशा कोणत्याही मार्गाने आढळत नाही.

मानवेतरांबाबत दाखविल्या जाणाऱ्या क्रौर्यासंबंधातील ॲक्विनासची भूमिका बरीच वादग्रस्त आहे. काहीशी अशीच भूमिका घेणाऱ्या रेने देकार्तने म्हटले आहे, "विवेकहीन जीव संवेदनाक्षम असत नाहीत. मानवेतर जीव संवेदनाही जैविकयंत्र असतात तर त्याउलट माणूस भौतिक शरीर (Matter) आणि अभौतिक मन (Mind) यांचा कविता संयोग असणारा एकजीव झालेला असतो".[८] यावरुनच, मानवेतरांना वेदना होत नाहीत, असा निष्कर्ष त्याने काढला आहे.

**रेने देकार्त : (१५९६-१६५०)**

देकार्तच्या विचाराचे सार पुढीलप्रमाणे मांडता येईल. "प्राणी म्हणजे केवळ यांत्रिक जीव (Organic machines), त्यांच्यामध्ये मन आणि आत्मा (consciounsness) नसतो. भौतिक विश्वामध्ये हालचालींचे दोनच संभाव्य स्त्रोत आहेत. मन आणि निखळ यांत्रिक शक्ती. मानवी हालचाली या मनातून कृतिप्रवण होत असल्या तरीही, प्राण्यांच्या हालचाली मात्र यांत्रिक शक्तीच्या जोरावर होतात. माणसाच्या शरीर अवयवांसारखेच अवयव प्राण्यांमध्येही असल्याने प्राण्यांच्या हालचाली मानसिक स्वरुपातून उगम पावतात, असे म्हणण्याचा मोह आपल्याला होण्याचा धोका आहे. तथापि, माणसांशी असलेल्या या वकरकरणी साम्यामुळे आपण प्रभावित होता कामा नये. अगदी माणसांच्या शरीराचे अवयवही निखळ यांत्रिकच आहेत, आणि माणसासारखी दिसणारी यंत्रे निर्माण करु शकतो, ज्यांच्या हालचाली केवळ यांत्रिकच असतात. विवेकाचा प्रधान मापदंड असलेली भाषा प्राण्यांमध्ये नसते, हे प्राण्यांना मन असल्याचे नाकारण्यासाठी एक मजबूत कारण आहे."

मानवेतर प्राणी म्हणजे यंत्र हा युक्तिवाद करताना देकार्तने पुढील दोन मुद्दे मांडले आहेत.

१) विवेकी जिवांमध्ये बोली भाषा असते तर प्राण्यांमध्ये नसते, आणि

२) मानवेतर प्राण्यांच्या वर्तनातून विचारांचे कोठेही दर्शन होत नाही".[९]

या विचारांच्या समर्थनार्थ देकार्तने कितीही जोरदार युक्तिवाद केला असला, तरी काही अविश्वसनीय आणि असंभवनीय असे निष्कर्ष पुढे येतात. अविवेकी माणसांना (लहान बालके) वेदना होत नाहीत, आणि म्हणून आपला छळ होऊ नये हा अधिकार त्यांना नसणार. असे जर असेल तर या निष्कर्षांशी आपण सहमत नसतो, तर ही माणसे (म्हणजेच बालके) इर प्राण्यांपेक्षा वेगळी कशी आहेत, हे सिध्द करावे लागेल, ते कसे करावयाचे हा प्रश्न शिल्लक राहतोच.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

देकार्तच्या विचारांचीच समकालीन पुनरावृत्ती रिचर्ड वॅटसन याने 'सेल्फ कॉन्शियसनेस ॲण्ड द राईट ऑफ नॉन - ह्यूमन ॲनिमल्स ॲण्ड नेचर' या पुस्तकामध्ये केली आहे. ''बहुतांश प्राणी अस्तित्व किंवा अनावश्यक वेदनांपासून (unnecessary pain) संरक्षण यासारख्या प्राथमिक हक्कांना पात्र नसतात. असे हक्क असण्यासाठी जिवाने नैतिक घटक असले पाहिजे, म्हणजेच आत्मभान (Self Consicous) स्वत:चा मुक्त विचार, नैतिक तत्वे समजून घेण्याची क्षमता आणि कर्तव्याच्या या तत्वानूसार कार्य करण्याचा हेतू आणि शारीरिक क्षमता या दोन्ही गोष्टी त्याच्यामध्ये असल्या पाहिजेत''.[१०] अशी कोणतीही गुणवैशिष्ट्ये किंवा क्षमता मानवेतरांमध्ये आढळून येत नाहीत, म्हणून त्यांना अधिकार असतात, असे म्हणता येत नाही, अशी वॅटसनची भूमिका आहे. त्याच्या या भूमिकेत नवे असे काहीच नाही, पारंपारिक नीतिशास्त्राचा मनुष्यकेंद्रित दृष्टीकोनच त्यातून दृग्गोचर होतो.

**इमॅन्युअल कान्ट :-**

आधुनिक कालखंडातील एक मध्यवर्ती आणि सर्वाधिक प्रभावी विचारवंत म्हणून निश्चितच इमॅन्युअल कान्ट यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांचे नैतिक तत्वज्ञान समजून घेणे म्हणजेच पश्चिमेत त्यांच्यानंतर नैतिक विचारांमध्ये झालेला विकास समजून घेणे होय.

देकार्तनंतर पाश्चात्य तत्वज्ञानावर सर्वाधिक प्रभाव कान्टचा आहे. अर्थात, त्याचेही विचार देकार्तवादीच आहेत. तथापि, या दोघांमध्ये एक महत्वाचा भेद आहे. माणसाशिवाय अन्य कोणालाही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अशा कोणत्याही प्रकारचे अधिकार देता येतील काय, याची चर्चा देकार्त करीत नाही. नैतिक चर्चेच्या संदर्भात त्याच्यादृष्टीने माणूस म्हणजे एक परिमाण (measure/standard) आहे. कान्टच्याबाबत मात्र परिस्थिती वेगळी आहे. केवळ माणसालाच बुध्दी असल्याने तोच एकमेव नैतिक घटक बनू शकतो, परिणामत: मानवेतरांना कोणतेही अधिकार असत नाहीत, असेच विचार कान्टने मांडले असले तरीही त्याच्या प्रतिपादनाचे स्वरुप थोडेसे वेगळे आहे. मानवेतरांविषयी माणसाच्या कर्तव्याचा प्रश्न जेव्हा उद्भवतो, तेव्हा आपल्या 'लेक्चर्स ऑन एथिक्स' मध्ये तो म्हणतो, ''प्राण्यांचा संबंध असेल तर आपली काहीही प्रत्यक्ष कर्तव्ये नाहीत. प्राण्यांना स्वभाव नसतो आणि केवळ एखाद्या साध्याचे साधन (mean) म्हणूनच ते असतात. हे साध्य (End) म्हणजेच माणूस''.[११]

तथापि, याचा अर्थ माणूस हव्या त्या पध्दतीने प्राण्यांना वागवू शकतो, असा नाही. खरे तर प्राण्यांबाबत आपली काही कर्तव्ये आहेत, मात्र प्राणी म्हणून त्यांच्यामध्ये (themselves) असलेल्या काही बाबींवर ती आधारलेली नाहीत, असे कान्टचे म्हणणे आहे. तो लिहितो, ''प्राण्यांच्या स्वरुपात आणि माणसाच्या स्वरुपात साधर्म्य (analogy) आहे, आणि मानवी स्वरुपाच्या अविष्कारासारख्याच प्राणी स्वरुपाच्या आविष्काराबाबत काही कर्तव्ये करून आपण माणसाबाबतच आपली काही कर्तव्ये करीत असतो. प्राण्यांबाबतच्या दयाभावनेतून माणसांबाबतही दयाभावना जागी होत असते. प्रयोगासाठी प्राण्यांचा वापर करणे निश्चितच क्रूरपणे वागत असतात. (तरीही) प्राण्यांना माणसांचे साधन मानले गेले पाहिजे, म्हणून ते आपल्या क्रौर्याचे समर्थन करु शकतात. तेव्हा प्राण्यांबाबतची आपली कर्तव्ये ही माणसांबाबतचीच अप्रत्यक्ष कर्तव्ये आहेत''.[१२]

ॲक्विनासप्रमाणेच प्राण्यांचे अस्तित्व माणसांसाठीच आहे, असेच कान्ट मानतो, मात्र, प्राण्यांशी आपण कसे वागतो त्याचा परिणाम सहोदर माणसांशी कसे वागतो त्याच्यावर होतो, असे मात्र कान्ट मानतो. उदारहणार्थ, प्राण्यांचा छळ करणे प्राणी म्हणून अयोग्य नसते, तर त्यामुळे आपण आपल्या सहोदर (Fellow) माणसांवर ज्या वेदना लादतो त्याबाबत माणूस असंवेदनक्षम होत असतो म्हणून ते अयोग्य आहे. तेव्हा कान्टच्या मते प्राण्यांबाबत असलेली आपली जबाबदारी अप्रत्यक्ष स्वरुपाची आहे. कारण तिची निर्मितीच मानवी हितसंबंधातून होत असते.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

आतापर्यंत आपण थोडक्यात मानवेतर प्राण्यांबाबत धार्मिक (ज्यू-ख्रिश्चन) व पारंपरिक तात्विक दृष्टीकोन (ॲरिस्टॉटल, ॲक्विनास, देकार्त आणि कान्ट) यांचा आढावा घेतला. तो सर्वस्वी मनुष्यकेंद्री असल्याचे आपल्याला आढळून आले आहे. आज आपण प्राण्यांचा ज्या पध्दतीने उपयोग करतो, त्याच्या मुळाशी हीच विचारसरणी आहे.

आपल्या अगदी प्राथमिक अवस्थेपासून माणूस प्राण्यांचा उपयोग विविध कारणांसाठी करीत आलेला आहे. सर्वांत प्रथम अन्नासाठी म्हणून माणूस शिकार (Hunting) करावयाचा, नंतर तो मृगया, (मौज, छंद म्हणून होणारी शिकार) करु लागला. उदरभरण व शेती यासाठी प्राणी उपयुक्त आहेत, म्हणून त्यांचे पालन करण्यास माणसाने त्यानंतर प्रारंभ केला. पशुपालन हा त्याचा एक व्यवसाय होऊन गेला. सध्या मात्र माणूस प्राण्यांचा उपयोग मुख्यतः दोन गोष्टींसाठी करतो. पहिला म्हणजे प्रयोगासाठी (Experimentation) आणि दूसरा म्हणजे प्राण्याचे अन्न म्हणून एखाद्या वस्तूसारखे उत्पादन करण्यासाठी (Animal Farming) यापूढील भागामध्ये मी या बार्बींची सविस्तर चर्चा करणारच आहे. उपरोक्त दोन मुख्य मुद्यांव्यतिरिक्त इतर अनेक उपयोगांमुळेच आपल्याला प्राण्यांच्या हक्कांची चर्चा करावी लागत आहे. मात्र तरीही या दोन उपयोगांमुळेच अभुतपूर्व अशा रीतीने माणूस आणि प्राणिविश्वामध्ये व त्यांच्या नैतिक विश्वामध्ये खळबळ उडाली आहे. या दोन प्रकारांसोबतच इतर काही उदा : कातड्यांचा वापर, प्राणिसंग्रहालये, प्राण्यांमध्ये होणारी स्पर्धा, रस्त्यांवर खेळ मांडून प्राण्यांचे शोषण करण्याच्या रीती, शोभेची वस्तू म्हणून मिरविणे, अशा अनेक रीतींबाबत चर्चा केली जाते. हे पाहण्यासाठी सांप्रतकालीन मनुष्य प्राण्यांचा कशा रीतीने वापर करतो, त्याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

मानवी संस्कृतीचा विकासच प्राण्यांच्या बलिदानावर उभारलेला आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्त ठरु नये. सर्वांत प्रथम माणूस निसर्गात फिरत असताना कंदमुळे आणि फळे यांच्याबरोबर प्राण्यांनाही मारुन खात असे. अर्थात, प्राण्यांची हत्या तो केवळ भक्ष्य या कारणासाठी करीत नव्हता, तर त्यामागे स्वतःच्या संरक्षणाचाही एक हेतू होता. मात्र शेतीच्या शोधतून त्याने पशुपालनास आरंभ केला, की शेतीच्या शोधाच्याही आधी त्याने पशुपालन आरंभ केला होता, यासंदर्भात मतभेद असल्याने या दोहोंचा आरंभ एकमेकांच्या मागेपुढे केव्हा तरी झाला असे मानावे लागेल. अर्थात, संस्कृतीच्या प्रत्येक टप्यावर तो प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात उपयोग करताना आढळतो. त्यामुळे सध्याच्या प्राण्यांच्या उपयोगाच्या मुळाशी त्याची हजारो वर्षांपासूनचीचालत आलेली मानवेतर प्राण्यांबाबतची वृत्तीच असल्याचे यातून स्पष्ट होते. प्राणी माणसाच्या उपयुक्ततेचे साधन आहेत, या विचारानेच आपल्याला ग्रासून टाकले आहे.

**मानवेतर प्राण्यांचे सध्याचे वापर**

१) शिकार (Hunting)
२) अन्न (Food)
३) प्रयोग, संशोधन, उत्पादन चाचणी, शिक्षण (Experimentation and for Research)
४) मनोरंजनासाठी होणारा वापर-प्राणिसंग्रहालय, सर्कस, प्राण्यांच्या विविध कसरती (झुंजी) दाखवून पैसे मिळविणे आणि त्यातून स्वतःचे पोट भरणे. (Entertainment)
५) व्यापार-प्राण्यांच्या कातडीचा आणि प्रत्येक अवयवांचा व्यापार (For Business)

वरील पाचही प्रकारांसाठी प्राण्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. याशिवाय धार्मिक कार्यामध्ये प्राण्यांचा बळी देण्याची परंपरा तर काही पौर्वात्य आणि पाश्चात्य धर्मामध्ये आढळून येते. आपण अशा एका संस्कृतीचा भाग आहोत, ज्यामध्ये प्राण्यांना अन्नासाठी, प्रयोगासाठी, संशोधनासाठी, कपड्यांसाठी, नव्या औषधांच्या चाचणीसाठी-विकासासाठी, व्यापारासाठी बेदरकारपणे वापरले जाते. यातील अनेक प्रकारांमुळे (किंबहूना सर्वच) प्राण्यांना वेदना

होतात. आपल्या व्यवहारातून होणाऱ्या वेदना पाहिल्या तर प्राण्यांना जीवनाचा किंवा वेदनामुक्त राहण्याचा अधिकारच नाही की काय असे वाटावे, अशी परिस्थीती आहे.

**शिकार :-**

शिकार या पहिल्या प्रकाराचा आढावा आता घेऊ. अनेक नियतकालिके आणि या विषयावरील लेखकांच्या लिखाणामध्ये प्राण्यांच्या अशा वापराच्या नोंदी करण्यात आल्या आहेत. त्यातील एक उदाहरण पुढीलप्रमाणे.

रेगनने त्याच्या 'ॲनिमल राईट्स, ह्यूमन रॉंग्ज' या निबंधामध्ये प्राण्यांची क्रौर्यपूर्वक शिकार कशी केली जाते याचे वर्णन देवमाशांची शिकार करणाऱ्या एका शिकाऱ्याच्याच हवाल्याने दिली आहे, ते असे :

"बंदूक धडाडते, पाणतीर हवेतून रोंरावत सुटतो आणि देवमाशाचा (Whale) वेध घेतो. एक क्षणभर शांतता असते आणि ज्या क्षणी पाणतीराची कळ कार्यान्वित होते, तेव्हा स्फोटाचा धडका उडतो. आता देवमासा आणि मासेमाऱ्यांमध्ये अक्षरशः जीवनाचा संघर्ष सुरु होतो. या संघर्षाचा केवळ एकमेव परिणाम संभवतो. देवमाशाच्या शरीरामध्ये बॉम्बस्फोटाने खोलवर जखम झालेली आहे आणि शरीरातून पाणतीर काढून टाकण्यात तो यशस्वी झाला तरीही त्याचा मृत्यु अटळ आहे. त्याची ही स्थिति असतानाच दुसरा एक पाणतीर त्या देवमाशाचा वध घेतो. आणखी एक स्फोट होतो. आता सुरु होते देवमाशाची अक्षरशः तडफड जीवघेण्या तगमगीनंतर तो देवमासा रक्त ओकतो आणि पोट वर करुन पाण्यावर तरंगु लागतो, त्याचे अस्तित्व संपले आहे".[१३]

देवमासा ही प्रजाती आता न परतीच्या वाटेवर प्रवास करू लागली आहे, तर ती दूर्मिळ आणि त्याचप्रमाणे संरक्षितही आहे. तरीही त्याची अशी शिकार का केली जाते ? मेणबत्तीच्या मेणासाठी, साबण-तेलासाठी, पाळीव प्राण्यांच्या खाद्यासाठी, मार्गारीनसाठी, खतासाठी की सौंदर्यप्रसाधनासाठी असा सवाल रेगन करतो. अत्यंत उच्च अशा तंत्रज्ञानाचा वापर या शिकारीमध्ये केला जातो. जेवढे तंत्रज्ञान उच्च तेवढा शिकारीचा वेळ कमी, तथापि, क्रौर्य मात्र अधिक आणि शिकारीचे प्रमाणही अधिक असे या तंत्रज्ञानाचे आणि शिकारीचे समीकरण असते.

RESEARCHJOURNEY

**अन्नासाठी होणारा प्राण्यांचा वापर :-**

अन्न म्हणून प्राण्यांचा वापर होणारा उपयोग संभवतः सर्वांत जूना आणि मोठ्या प्रमाणावर पसरलेला प्रकार आहे. आधुनिक जीवनशैलीमध्ये तर याला फारच महत्व प्राप्त झालेले आहे. जेव्हा आपण प्राण्यांचा नैतिक घटक म्हणून विचार करतो, तेव्हा त्याचा अन्न म्हणून उपयोग करण्यांबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात. "एस्किमोंच्या संदर्भात प्राणिहत्या एकवेळ ग्राह्य ठरु शकते, कारण त्यांना त्याशिवाय पर्यायच नसतो. तो त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न असतो. त्याला मांसभक्षण करावेच लागते".[१४] पण आधुनिक समाज ज्या पध्दतीने मांसाकार करतो, त्याचे समर्थन होऊ शकत नाही. मांसाहार कसा असमर्थनीय ठरतो याबाबतच नेहमी पुढील मुद्यांची चर्चा केली जाते. वैद्यकीयदृष्ट्या हे सिध्द झाले आहे की, दीर्घायुष्यासाठी किंवा पोषणमूल्यांसाठी मांसभक्षण आवश्यक नाही. औद्योगिक समाजामध्ये जेव्हा मांसासाठी म्हणून प्राण्यांची पैदास केली जाते, तेव्हा त्यांना जे अन्न दिले जाते, ते अन्न आपण प्रत्यक्ष ग्रहण करु शकतो, त्याचप्रमाणे जे धान्य आपण प्राण्यांना देतो ते पोषणाच्या दृष्टीने त्या प्राण्यांच्या मांसामधून केवळ १० टक्के परताव्याच्या स्वरुपात आपल्याला पुन्हा मिळत असते. तेव्हा त्याचा कोणत्याच दृष्टीने उपयोग नाही, फक्त रुचीच्या दृष्टीनेच त्याचा उपभोग घेतला जातो.

प्राण्यांचा अन्नासाठी उपयोग करणे गैर आहे, असे जेव्हा एखादा म्हणतो तेव्हा त्याला आधार असतो, तो प्राण्यांप्रती माणसांकडून होणाऱ्या अमानुष कृती रोखणे हा. या अमानुषणाचे वर्णन पुढीलप्रमाणे करता येईल. "माणसाने अन्नासाठी नेहमीच इतर प्रजातीच्या जिवांना मारले आहे. पण आज तो ज्या पध्दतीने त्यांची कत्तल करतो, तशी त्याने कधीच केली नसेल. शेती ही तर आता व्यावसायिक पध्दतींचा बळी ठरली आहे. तिचा उद्देश जास्तीत जास्त उत्पादन

करुन नफा कमविणे हा झाला आहे".[१५] आधुनिक शेती पध्दतीमध्ये आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर केला जातो, जे प्राण्यांच्या दृष्टीने अत्यंत घातक असते, आणि समाज त्याला आक्षेपही घेत नसतो. अशा स्वरुपाच्या पशुपालनामध्ये प्राण्यांना अत्यंत अनैसर्गिकरित्या डांबून वाढविले जाते. त्याच्या जन्मापासून त्याला कापण्यापर्यंतच्या कार्यकाळापर्यंत त्यांचे चारा खाऊन मांसाचे उत्पादन करणाऱ्या यंत्रातच रुपांतर केले जाते. हे सर्व जर बंद व्हावे, असे वाटत असेल तर त्यासाठी आपल्याला खाण्यापिण्याच्या वृत्ती बदलाव्या लागतील.

आहारासाठी म्हणून ज्या प्राण्यांची पैदास केलीजाते, त्यामध्ये अर्थातच त्या शेतकऱ्यांचा फायदा व्हावा हा हेतू असतो. तसा तो असतो यात काहीही नवल नाही. मात्र त्याचे परिणाम प्राण्यांच्यादृष्टीने अत्यंत विदारक असतात. एखाद्या शेतकऱ्यांसमोर फायदा वाढविण्याचे दोन मार्ग असतात. पहिला म्हणजे आपल्या उत्पादनासाठी जादा भाव मिळविणे किंवा दूसरा म्हणजे त्या उत्पादनावर कमी खर्च करणे, मांसासाठी लोक किती पैसे देतील यावर काही मर्यादा असल्याने उत्पादन खर्चामध्ये कपात करण्याबाबत जास्तीत जास्त प्राणी डांबण्याची वृत्ती वाढते आणि त्या प्रमाणात मांसाच्या उत्पादनासाठी होणारा खर्च कमी होतो.

अशाच रीतीने अनैसर्गिक वातावरणात वाढविल्या जाणाऱ्या एका वासराचे उदाहरण यासंदर्भात समर्पक आहे. एखाद्या कळपात नर वासरू जन्माला आले. हे वासरु काही आपल्याला दूध देऊ शकत नाही. तेव्हा सर्वसाधारण अवलंबिला जाणारा उपाय म्हणजे विशिष्ट प्रकारच्या कोवळ्या मांसासाठी त्याची विक्री करणे. असे केवळ मांस मिळविण्यासाठी, ते वासरु उंडारले तर त्याचे मांस चिवट होत असल्याने आणि त्याच्या शरीरातील लोह वाढून मांस लाल होत असल्याने, त्याच्या उंडारण्यावर बंधने टाकली जातात. ज्यामुळे त्याचे मांस कोवळे राहते आणि लालही होत नाही, कारण लाल मांसापेक्षा श्वेतवर्णीय मांसाला अधिक मागणी असते. तेव्हा, त्या वासराला बंद दाराआड हालचालीला फारसा वाव नसलेल्या आणि ती जागा वारंवार लहान करता येईल, अशा एका खोलीत बंद केले जाते. त्याचे अल्पकालीन जीवन त्यामुळे केवळ अंधारात जाते. त्याचा इतरांशी संपर्क येत नाही. त्याला काही खाण्यासाठी दिले जाते, तेव्हा किंवा त्याला शेवटी कत्तलखान्याकडे नेले जाते तेव्हाच त्याचा प्रकाशाशी संपर्क येत असेल तेवढाच.

"ही झाली अंधाऱ्या शेडची गोष्ट. सुमारे अठरा इंच बाय वीस इंच आकाराच्या शेडमध्ये ४ ते ५ कोंबड्या डांबल्या जातात. अधिकाधिक अंडी मिळावित म्हणून तापमान व प्रकाशाचे नियंत्रण आणि औषधांचा मारा केला जातो. तारेचे घसरते पिंजरे तयार केले जातात, जेणेकरुन त्यांची अंडी व्यवस्थित खाली घरंगाळावीत व त्यांचे शेणही खाली व्यवस्थित जमा व्हावे. त्याचप्रमाणे मोठे उडणारे पक्षीही पिंजऱ्यांमध्येच ठेवले जातात. अशा परिस्थितीत साऱ्या पक्ष्यांच्याच नैसर्गिक कृतींवर पायबंद बसतो. त्यांच्यात एकमेकाला टोचून मारण्यासारख्या विकृती जन्माला येतात. या सर्व गोष्टी टाळण्यासाठी अनेकदा त्यांच्या चोची कापल्या जातात व त्यांच्या शेड अंधाऱ्या ठेवल्या जातात. हीच गोष्ट गर्भार असलेल्या डुकरिणीच्या संदर्भातही आहे. कृत्रिम जननक्षमतावाढीच्या उपायांमुळेच डुकरिण गर्भार राहण्याचे प्रमाण नेहमीच मोठे असते. अशा कोंडल्या गेल्यामुळे त्यांचे चलनवलन कमी होते. परिणामी व्यायाम होत नाही. म्हणून त्यांना खाद्य कमी लागते. शिवाय अखाद्य अशा मांसाची वृध्दी होत नाही. बहुतांशी त्यांच्या अंगावर एवढे मांस चढते की, त्यांना धड चालवतही नाही. या अशा नैसर्गिक वाढीमुळे त्यांच्यात विकृती निर्माण होऊन त्या हिंसक बनतात. अशीच प्रथा व्यापारी पशुपालनामध्ये चालते".[१६]

वर देण्यात आलेली उदाहरणे केवळ वानगीदाखल आहेत. अशाप्रकारे हजारो लाखोपटीने प्राण्यांची कत्तल जाते. जगभरात नेमके किती प्राणी मारले जातात, अथवा त्यांना यातना दिली जाते हे आपल्याला नक्की सांगता येणार नाही. कारण त्याची अधिकृत आकडेवारी व त्याच्यासाठी असणारा एखादा सर्वसमावेशक काया अस्तित्वात नाही, तसे पाहू गेल्यास काही कायदे तुरळक प्रमाणात दिसून येतात, पण तेही पूर्वग्रहदूषित व माणसाचा पक्षपात करणारेच आहेत.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

काही उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत. गेल्या पन्नास वर्षांमध्ये वीस लाख देवमासे मारले गेले. आजही इंटरनॅशनल व्हेलिंग कम्युनिटीच्या सदस्य राष्ट्रांमध्येसुध्दाही त्यांची मोठ्या प्रमाणात शिकार केली जाते. ''एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर अमेरिकेत दोनशे कोटी वाहक कबुतरे होती, आज एकही नाही. उत्तर अमेरिकेत श्वेतवर्णीय वसाहतवाद्यांनी जेव्हा पहिले पाऊल टाकले, तेव्हा तेथे ६ कोटी रानम्हशी होत्या, आज सर्वांत मोठा कळप ६०० म्हशींचा आहे. अमेरिकेचे राष्ट्रीय चिन्ह गरुड पक्षी आणि ऑस्ट्रेलियाचा राष्ट्रीय चिन्ह असलेला कांगारु आज विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहेत.''[१७] अशीच परिस्थिती भारताचा राष्ट्रीय पशुव पक्षी असणाऱ्या वाघ आणि मोरांबाबत आहे. बर्फाळ प्रदेशातील पांडाच्या संदर्भात तेच म्हणता येईल. विज्ञान आणि तंत्रज्ञान व संस्कृतीकरण / शहरीकरण ज्या झपाट्याने विकसित होत आहे, तेवढ्याच गतीने माणसाची जीवनशैली बदलत आहे. नुसती जीवनशैलीच नव्हे तर ती ज्या वृत्तीवर आधारलेली आहे, त्यातही मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. त्याचाच परिणाम निसर्गावर होताना दिसून येतो. या वन्यजीवांच्या अधिवासांवर होणारे वाढते अतिक्रमण आणि त्यांचे प्रदूषण यामुळे अनेक प्राणी-पक्षी कायमचे लुप्त झाले आहेत. आणखी बरेच आता न परतीच्या वाटेवर गेले आहेत. जैववैविध्य क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या तज्ज्ञांच्या मते, पूर्वी एखादी प्रजाती नष्ट होण्याचा किंवा ती उत्क्रांत होऊन अन्य एखाद्या प्रजातींमध्ये विलीन होण्याचा कालावधी काही हजार वर्षांचा असावयाचा आणि हे सारे होत असताना जैववैविध्य टिकून असावयाचे. आता मात्र हा कालावधी काही आठवडे-दिवसांवर आला आहे. यावरुन या प्रकाराची भयावहता आपल्या लक्षात येईल. हे उदाहरण दुर्मिळ व विनाशाच्या उंबरठ्यावर असलेल्या प्राण्याच्यासदर्भातील आहे. अन्नासाठी कत्तल केल्या जाणाऱ्या प्राण्यांसबंधातील अमेरिकेची काही वर्षांपूर्वीची आकडेवारी अशी आहे.

''एकट्या अमेरिकेत दहा कोटींहून अधिक गायी, तितक्या मेंढ्या, २० कोटी डुकरे, २०६ कोटी वासरे आणि ३०० कोटी कोंबड्या यांची कत्तल खाण्यासाठी केली जाते. याशिवाय जगभरात कोट्यावधी अन्य प्राणी-पक्ष्यांची कत्तल केली जाते, ती वेगळीच''.[१८]

**प्रयोगासाठी / संशोधनासाठी प्राण्यांचा उपयोग :-**

प्रतिवर्षी सूमारे २८ कोटी प्राण्यांचा संशोधनासाठी बळी दिला जातो, असा अंदाज आहे. यातील बहुतांशी प्राण्यांवर जैववैद्यक क्षेत्रातील, विशेषतः औषधांच्या संशोधनासाठी, संशोधनामध्ये अत्यंत क्रूरपणे अन्याय केले जातात.

''ग्रीक वैद्यक गोलन याने पहिल्या शतकामध्ये प्राण्यांचा वैद्यकीय कारणास्तव प्रथम वापर केल्याचे ज्ञात आहे''.[१९]

प्राण्यांवरील प्रयोगातून आपली प्रजातीभेदाची वृत्ती स्पष्ट होते, तर मांसाहार हा त्या वृत्तीचा गाभा आहे. खाण्यासाठी आणि प्रयोगासाठी प्राण्यांचा वापर मोठ्या प्रमाणात माणूस करतो. तेव्हा असा प्रश्न उपस्थित होतो की, खरेच या सर्वांची माणसांसाठी गरज आहे का ? मांसाहाराला पर्याय आहे. त्याचप्रमाणे आत्तापर्यंत आपण केलेल्या प्रयोगातून असे काही निष्कर्ष आपल्या हाती आले आहेत, की एवढेच माणसासाठी पुरेसे आहेत. (त्यापुढे प्रयोग चालू ठेवण्याची आवश्यकता नाही). तथापि, तरीही माणूस प्रयोगांवर प्रयोग करु लागला आहे. विज्ञान जसजसे प्रगत होत आहे तशी या प्रयोगांच्या पध्दतीमध्ये असणारी भयावहता अधिक वाढीला लागली आहे. एक उदाहरण तिचे वर्णन करण्यास पुरेसे आहे.

''ड्रेझ या संशोधकाच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ड्रेझ चाचीमध्ये प्रयोगासाठी एक ससा वापरण्यात येतो. डोळ्यांच्या विशिष्ट रचनेमुळे आणि रोपित करण्यात आलेले चुरचुरी आणणारे द्रावण बाहेर काढणे किंवा त्याची तीव्रता कमी करणे या सशांना अशक्य असल्यामुळे वा प्रयोगात ते उपयुक्त ठरतात. त्यामुळे हा ससा आणि यासारखे असंख्य ससे या चाचण्यांसाठी वापरले जातात. ड्रेझ चाचणीची प्रक्रिया साधारणतः अशी असते. सशाच्या एका डोळ्यामध्ये एका

ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

विशिष्ट पदार्थांचे तीव्र द्रावण टाकले जाते, तर दुसरा डोळा तुलनेसाठी तसाच ठेवला जातो. सूज, लाली, नेत्रगोलकाची हानी, दृष्टि-हास यांची मोजणी केली जाते आणि त्या विशिष्ट पदार्थांची उपद्रवक्षमता ठरविली जाते. सशांच्या डोळ्यामध्ये अत्यंत तीव्र स्वरुपात टाकले जाणारे हे द्रावण पदार्थांचे असते ? बहुदा एखादे सौंदर्य प्रसाधने, दंतमंजन, शांपू, मुखशुध्दकारक पावडर, हाताचे लोशन, नेत्रप्रसाधन, हाताचे क्रीम, केसांचे द्रव्य, सुंगधी द्रव्य, कोलोन यांपैकी काहीही त्या भूल न दिलेल्या सशाला त्या द्रावणाची आगआग का सहन करावी लागत असेल ? केवळ एका संशोधकाला एखाद्या मुखशुध्दीकारीकाची किंवा पावडरची किंवा कोलोनची डोळ्यांना हानी पोचविण्याची क्षमता समजून घेता यावी यासाठी''.[२०]

प्रयोग कसे चालतात, त्याचे स्वरुप कसे असते यासाठी उदाहरणाचा दाखला दिला आहे. तसे पाहू गेल्यास अनेक प्रकारच्या प्राण्यांवर अनेक पध्दतीने प्रयोग चालत असतात. उदाहरणार्थ, महाविद्यालयांकडून, औषध कंपन्यांकडून आणि लष्करांच्या संस्थांमधून कोट्यावधी प्राण्यांचा बळी दिला जातो.

पाळीव प्राण्यांचा व्यवसाय, प्राणिसंग्रहालये आणि वैद्यकिय प्रयोग चालू राहावेत, यासाठी एकट्या अमेरिकेमध्ये १९२९ या साली एका वर्षात कायदेशीररीत्या आयात करण्यात आलेल्या प्राण्यांची संख्या पुढीलप्रमाणे :

''१,०१,३०२ सस्तन प्राणी, यातील ८५,१५१ माकडे होती.

६,८७,९०१ वन्य पक्षी, यांतील असंख्य पोपट, मैना आणि राघू अन लाखोंच्या संख्येत ही आयात दरवर्षी चालूच आहे.

५,७२,६७० पृष्ठवंशीय (बेडूक, सॅलातमांडर वगैरे)

२१,०९,५७१ सरीसृप प्राणी''.[२१]

''एकट्या अमेरिकेमध्ये १९७८ साली वैज्ञानिक संशोधनासाठी ४ लाख कुत्री, २ लाख मांजरे, ३३ हजार एप माकडे, हजारो वासरे, शेळ्या-मेंढ्या-खेचरे-घोडे, लाखोंच्या संख्येत ससे, गिनी पिंग, उंदीर, पक्षी आदींचा वापर करण्यात आला. एकूण ६.४ कोटी प्राणी संशोधनासाठी वापरण्यात आले आहेत. जगभरात हा अंदाज वीस कोटींच्या घरात जातो''.[२२]

अन्न आणि प्रयोगासाठी म्हणून प्राण्यांचा वापर करण्याच्या परंपरेला भौगोलिक सीमा नाही. फारच कमी प्रकारातील तसेच फारच थोड्या प्राण्यांना कुटूंबातील सन्माननीय सदस्याचे स्थान मिळते. अन्यथा प्राण्यांचा दर्जा हा अत्यंत स्वस्त व क्षूद्र समजला जातो. प्राण्यांवर केले जाणारे अत्याचार मानवी हितसंबंधाचा नावावर होत असतात. आणि हाच माणसांच्या दृष्टीने अत्यंत लाजिरवाणा व घृणास्पद प्रकार आहे.

माणसांकडून प्राण्यांना देण्यात येणाऱ्या या वर्तणूकीच्या मुळाशी असणाऱ्या धार्मिक, पारंपरिक तात्विक दृष्टीकोन, तसेच माणसांकडून सध्या होत असलेला प्राण्यांचा वापर यांचा आढावा घेतला. तर वर वर्णन केलेल्या प्रयोगातून व आकडेवारीतून, अशा कोणत्याही कृतीतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे गांभीर्य लक्षात येते. म्हणूनच प्राणिहक्कवादी या कृतींचे व प्रथांचे तसेच त्यातून उपस्थित होणाऱ्या विविध नैतिक मुद्यांची मांडणी व विश्लेषण करुन. प्राणिहक्कांची नैतिक / तात्विक मांडणी करीत आहेत.

**संदर्भ :**

१. टीम हेवर्ड, अन्थ्रोपोसेंट्रीझम, एनसायक्लोपेडीया ऑफ अप्लाईड एथिक्स, खंड १ ॲकेडेमीक प्रेस, सॅनडिॲगो, १९९८ पृष्ठ-१७३.

२. इवलीन प्लूहर, ॲनिमल राईटस, एनसायक्लोपेडीआ ऑफ अप्लाईड एथिक्स खंड १, सॅन डीॲगो प्रेस, सॅन डीॲगो, १९९८ पृष्ठ. १६३.
३. तत्रैव, पृष्ठ १९६.
४. बायबल
५. इवलीन प्लूहर, ॲनिमल राईटस, एनसायक्लोपेडीआ ऑफ अप्लाईड एथिक्स, उनि.पृष्ठ १६४.
६. इंटरनेट एनसायक्लोपेडीआ ऑफ फिलॉसॉफी.
७. टॉम रेगन अँड पिटर सिंगर, ॲनिमल राईटस्, अँड ह्युमन आब्लीगेशन, प्रेटींस हॉल एंजलवूड क्लिफ्स, न्यू जर्सी, पृष्ठ ६-९.
८. इवलीन प्लूहर, ॲनिमल राईटस, एनसायक्लोपेडीआ ऑफ अप्लाईड एथिक्स, उनि.पृष्ठ१६४.
९. देकार्तस, डीस्कोर्स ऑन मेथड अँड मेडीटेशन, अनुवाद, लुई लॉफ्लाऊ बॉब मेरीज, न्युयार्क, १९६०, पृष्ठ ४२.
१०. रिचर्ड वॅटसन, सेल्फ कॉन्शियनेस अँड द राईट ऑफ नॉन ॲनिमल्स अँड नेचर, एनव्हायर्नमेंटल एथिक्स, खंड १, (१९७९), पृष्ठ ९९.
११. इम्यॅनुअल कांट, लेक्सर्च ऑन एथिक्स, अनु.लुईस इनफिल्ड, हॉर्पर, अॅड.रो.न्युयॉर्क, १९६३, पृ.२३९.
१२. तत्रैव, पृष्ठ २३९-२४०.
१३. टॉम रेगन, ॲनिमल राईट्स ह्युमन रॉग्ज, एनव्हायर्नमेंटल एथिक्स, १९८० (२) पृष्ठ १००.
१४. पिटर सिंगर, प्रॅक्टीकल एथिक्स, २ री आवृत्ती केंब्रीज युनिव्हरसीटी प्रेस केंब्रीज, २००० पृष्ठ३२.
१५. पिटर सिंगर, ॲनिमल लिबरेशन द मोरल लाईफ, संपा.स्टीवन लुपर, कर्टीस ब्राऊन, हरकोर्ट कॉलेज, पब्लीकेशन, टोरंटो, यु.एस.ए., पृष्ठ ६२२
१६. तत्रैव, पृष्ठ, ६२२
१७. रिपोर्ट ऑन युनायटेड नेशन्स फुड अँड अग्रीकल्चरल ऑर्गनायझेशन १९८६.
१८. टॉम रेगन, ॲनिमल राईट्स ह्यूमन रॉग्ज, एनव्हायर्नमेंटल ऐथिक्स, १९८० (२) १०३.
१९. जयपॉल आझारीया, बायोएथिक्स इन इंडिया, संपा.हिल्डा आझारीया, डॅरील आर. जे. मॅकेर, फ्युबियास एथिक्स इन्स्टीट्युट, चेन्नई १९९८, पृष्ठ १८४.
२०. हॉन्स रुईश, स्लॉस्टर ऑफ इन्नोसंट, उधृत टॉम रेगन, ॲनिमल राईट्स ह्यूमन रॉग्ज, उनि.पृष्ठ १०१-१०२.
२१. रेगेस्टीन, पॉलीटीक्स ऑफ एक्सिटक्शंन, पृष्ठ १३१, उधृत टॉम रेगन अँड पिटर सिंगर, ॲनिमल राईट्स ह्यूमन ऑब्लीगेशन, प्रेंटीस हॉल एंजलवूड क्लिफस, न्युजर्सी, पृष्ठ १४.
२२. रायडर, एक्सिपरीमेंट ऑन एनिमल्स, संपा. टॉमरेगन अँड पिटर सिंगर उनि.पृष्ठ-९.